**Q.P. Code : 28498**

**( २ तास )** **( एकूण गुण : ६०**

**सूचना :** (१) **सर्व** प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहे.
(२) **सर्व** प्रश्नांना **समान गुण** आहेत.

१. बहामनीकालीन राजकीय पार्श्वभूमी सांगून समकालीन समाजजीवनावर त्याचा काय परिणाम झाला होता ते साधार सांगा.

**किंवा**

बहामनीकालीन सांस्कृतिक पार्श्वभूमी साधार स्पष्ट करा.

२. बहामनीकालीन वाङ्मयलेखनाच्या प्रेरणा समकालीन लेखनातून कशा दिसतात ते सोदाहरण नमूद करा.

**किंवा**

'समकालीन स्थितीगती आणि राजकीय परिस्थिती या बहामनीकालीन वाङ्मयलेखनाच्या प्रेरणा होत्या'. सविस्तर चर्चा करा.

३. संत एकनाथांनी 'रूक्मिणी स्वंयवरा'तून समकालीन समाजजीवनाचे दर्शन कसे घडविले आहे ते साधार लिहा.

**किंवा**

मुक्तेश्वरांनी 'मुर्खाची लक्षणे' च्या माध्यमातून समकालीन समाजासमोर ठेवलेल्या नैतिक मूल्यांचा थोडक्यात आढावा घ्या.

४. खालील प्रत्येक गटातील एकेक टीप लिहा :

(अ) (१) बहामनीकाळातील धार्मिक जीवन.
(२) वारकरी संप्रदायाचे सामाजिक संदर्भ.

(ब) (१) बहामनीकाळातील वाङ्मयनिर्मितीमागील सांप्रदायिक प्रेरणा.
(२) बहामनीकाळातील वाङ्मय आणि सामाजिक प्रेरणा.

(क) (१) 'रूक्मिणीस्वयंवरा'तील कृष्णाला लिहिलेले पत्र.
(२) 'मुर्खाची लक्षणे'मधील सामाजिकता.